दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २७३ वा | शनिवार दि. २९ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## मंत्र्यांचे कंट्रोल रुममध्ये बसून फोटोशूट : आदित्य ठाकरे



**मुंबई ।** मुंबईतल्या सखल भागांमध्ये गेल्या दोन दिवसात झालेल्या पावसाने पुन्हा पाणी साठताना दिसत आहे. मात्र अशावेळी लोकांसाठी काही कामे करण्याऐवजी शिंदे सरकारमधील मंत्री केवळ फोटोशुट करण्यात व्यस्त आहेत. आम्ही सत्तेत आम्ही असताना पावसाच्या आधी यासंदर्भात बैठक घ्यायचो. अभ्यास न करता सध्याचे मंत्री आणि घटनाबाह्य सरकार आम्ही बनवलेल्या कंट्रोल रुममध्ये बसून फोटोशूट करतात. पण लोकांसाठी काही कामं करत नाही, असा सणसणीत आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

## न्यूज कॉलम

### वाहतूक शाखेतर्फे ६० हजारांची दंडवसुली

**धुळे ।** शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भूषण कोते, सहाय्यक अधिकारी जितेंद्र आखाडे, हवालदार राजेंद्र पवार, प्रवीण नागरे, मनोहर महाले, विलास मालचे, तौफिक शेख, मयूर पाटील, ज्ञानेश्वर देसले, विवेक वाघमोडे आदींनी साक्री रोडवरील श्री संतोषीमाता चौकात दुपारी बारा ते एकपर्यंत विशेष मोहीम राबविली. यात वाहनधारकांकडे प्रलंबित असलेली मोटार वाहन कायद्यांतर्गत ६० हजारांची दंडवसुली केली.

### ट्रक चालकावर दोघांचा कुऱ्हाडीने हल्ला

**धुळे ।** किरकोळ कारणावरून ट्रक चालकावर दोघांनी कुर्हाडीने हल्ला केल्याची घटना बाळापूर (फागणे) गावात घडली आहे. सत्यजीत प्रकाश वाघ वय २८ या ट्रक चालकाने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २५ रोजी रात्री आठ वाजता श्रीपती पेट्रोलपंपावर लावलेल्या ट्रकमुळे सत्यजीत यांना त्यांचा ट्रक बाहेर काढण्यास अडचण होत होती. ट्रक बाजुला घे असे सांगितलेल्या कारणावरून बापु नारायण पाटील, भावड्या पाटील दोघे रा. बाळापूर यांनी सत्यजीत यांच्यावर कुर्हाडीने हल्ला करून त्यांना जबर जखमी केले.

# धुळ्यात निकृष्ट जलकुंभामुळे पाण्याची नासाडी

## दीडशे कोटी रूपयांच्या पाणीयोजनेचा झाला खेळखंडोबा

**धुळे । प्रातिनिधी**

शहरात १५४ कोटी पाणीपुरवठा योजेंअंतर्गत नगांवबारी येथे उभारण्यात आलेल्या दोन जलकुंभांचा साडेचार वर्षापासुन वापरझालेला नाही.

त्यामुळे जलकुंभाा चारही बाजुने मोठया प्रमाणावर तडे पडले आहेत. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना अंतर्गत धुळे शहरात आणलेल्या पाण्याने हे जलकुंभ मागिल काही दिवसांपासुन भरण्याचे काम सुरु होते. जलकुंभ पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्या जलकुंभाना सर्वत्र तडे असल्याने त्यातुन पाणी झिरपण्यास सुरुवात झाली. ही बाब म.न.पा. प्रशासनास कळाल्यानंतर तातडीने जलकुंभातुन पुर्ण पाणी लगत असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रं. ३ वर सोडण्यात आले.

जलकुंभामध्ये जास्त कालावधीसाठी पाणी ठेवले असता जलकुंभ फुटण्याची दाट संभावना आहे. जलकुंभाना लगतच नगांवबारी परिसरातील दाट वस्ती आहे. या वस्तीत कच्चे व पक्के घरे आहेत. अश्या परिस्थितीत सदर जलकुंभ फुटल्यास वित्तहानी होईल. तसेच जिवीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. याच कारणास्तव म.न.पा. प्रशासनाने सदरचे जलकुंभ पुर्णतः खाली करण्याचा निर्णय घेतला. १५४ कोटीच्या पाणीपुरवठा अंतर्गत बांधलेले जलकुंभ हे इस्टीमेट प्रमाणे तयार करण्यात आलेले नाही. सदरचे काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. सदर कामांमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. सदर जलकुंभाना बांधल्यापासुन काही दिवसातच तडे गेल्याचे स्पष्ट दिसत होते. त्यामुळे सदर कामांची चौकशी होण्याबाबत यापुर्वीही मागिल अनेक वर्षापासुन देवपुर शिवसेना तसेच शिवसेना महानगर, धुळे मार्फत मोठया प्रमाणावर मागणी केल्यावरही सत्ताधारी भाजप पक्षातील काही पदाधिकारी व नगरसेवक तसेच म.न.पा. प्रशासनातुन काही अधिकारी यांनी ठेकेदाराशी आपसात संगनमत करुन, सदर कामतील भ्रष्टाचार लपविण्याच्या हेतुने आजतागायत कोणतीही कार्यवाही केली नाही. १५४ कोटी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उभारण्यात आलेले जवळपास सर्वच म्हणजे १३ जलकुंभ अशाच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे निकामी झाल्या आहेत. जवळपास सर्वच जलकुंबांना अशाच पद्धतीचे तडे गेल्याने जलकुंभ पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्यातूनही पाणी गळण्याची दाट शक्यता आहे. १५४ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उभारलेल्या १३ जलकुंभ द्वारेच संपूर्ण धुळे शहरास पाणीपुरवठा होणार होता. तेरा जलकुंभान पैकी अनेक जल कुंभाचे अद्याप टेस्टिंग केलेल्या नाहीत. सर्वच जलकुंबांच्या टेस्टिंग केल्यानंतर जवळपास सर्वच जलकुंभ निकामी अवस्थेत असल्याचे निष्पन्न होण्याची दाट शक्यता आहे. कारण सदर जलकुंभ देखील मागील सुमारे साडेचार वर्षांपासून वापरण्यात आलेले नाही. सदर पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार एकदम बाहेर येऊ नये याच एकमेव कारणास्तव, शिवसेनेच्या अनेक निवेदने व आंदोलनानंतर देखील मनपा प्रशासनाकडून अद्याप इतर जलकुंभां ची टेस्टिंग झालेली नाही. यावरून ही बाब स्पष्ट झाली आहे की, संपूर्ण शहरास पाणीपुरवठा करणारे १३ जलकुंभ निकामी असल्याकारणाने पाणीपुरवठा योजनेतून १५४ कोटी व अक्कलपाडा योजनेतील १७५ कोटी असे संपूर्ण एकूण धुळेकरांचे ३२९ कोटी हे व्यर्थ गेलेले आहे.

### महामार्गावर सोडले पाणी

**नगांवबारी येथे उभारण्यात आलेल्या दोन जलकुंभांचा साडेचार वर्षापासुन वापर झालेला नाही. त्यामुळे जलकुंभाा चारही बाजुने मोठया प्रमाणावर तडे पडले आहेत. मात्र ते पुन्हा भरल्याने जलकुंभ फुटण्याची शक्यता होती. त्यामुळे ते पाणी रस्त्यावर सोडण्यात आले. त्यामुळे मात्र हजारो लिटर पाणी वाया गेले आहे. एकीकडे धुळेकर जनतेला आठ दिवसानंतर पाणी पुरवठा करण्यात येत आहे.**



### जलकुंभ निकामी अवस्थेत

१५४ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उभारलेल्या १३ जलकुंभ द्वारेच संपूर्ण धुळे शहरास पाणीपुरवठा होणार होता. तेरा जलकुंभापैकी अनेक जल कुंभाचे अद्याप टेस्टिंग केलेल्या नाहीत. सर्वच जलकुंभांच्या टेस्टिंग केल्यानंतर जवळपास सर्वच जलकुंभ निकामी अवस्थेत असल्याचे निष्पन्न होण्याची दाट शक्यता आहे. कारण सदर जलकुंभ देखील मागील सुमारे साडेचार वर्षांपासून वापरण्यात आलेले नाही. सदर पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार एकदम बाहेर येऊ नये याच एकमेव कारणास्तव, शिवसेनेच्या अनेक निवेदने व आंदोलनानंतर

### तर जलकुंभ फुटले असते : ललित माळी

**पाणीयोजनेत प्रशासन पूर्णतः अपयशी ठरलेले आहेत. धुळेकरांचे 'पाणी' या विषयावर सत्ताधारी भाजप पक्षाकडून सातत्याने मोठ्या प्रमाणावर राजकारण केले जात आहे. धुळेकरांना दररोज पिण्याचे पाणी यावर ३२९ कोटी खर्च करूनही मिळणार नाही. केवळ भ्रष्टाचार लपवण्यासाठी धुळेकरांना भाजप सत्ताधारी व मनपा प्रशासनाकडून 'उल्लू' बनवले जात आहे. दोन्ही जलकुंभांचे काम निकृष्ट दजार्च आहे. जलकुंभ भरले असते तर ते फुटले असते. त्यातून इर्शाळवाडीसारखी घटना घडली असत - ललित माळी,** विधासभा संघटक, उबाठा शिवसेना

# नाशकात तब्बल दीड कोटींचा गुटखा जप्त

## नाशिक अन्न आणि औषध प्रशासनाची मोठी कारवाई



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरातील पंचवटीतील एका दुकानावर अन्न आणि औषध प्रशासन विभागाने छापा टाकून तब्बल दीड कोटींचा गुटखा जप्त केला आहे. नाशिक अन्न आणि औषध प्रशासनाने दुकानात, चारचाकी वाहनात आणि घरात साठविलेला सुमारे दीड कोटी रुपयांचा गुटखा आणि वाहनं जप्त करून दुकान सील केले. याप्रकरणी दुकान मालकाच्या विरोधात आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रतिबंधित केलेला गुटखा आणि तत्सम अन्न पदार्थाची छुप्या मार्गाने विक्री होत असल्याने अन्न आणि औषध प्रशासनाने छापासत्र सुरू केले आहे. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे सहआयुक्त संजय नारगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त उदय लोहकरे यांच्यासह पथकाने आडगाव परिसरातील खंडेराव मंदिरासमोरील मे. महालक्ष्मी ट्रेडर्स या दुकानावर छापा टाकला. यावेळी मालक प्रशांत कचरू सावळकर हा उपस्थित होता. अधिकाऱ्यांनी पेढीची झडती घेतली असता ३ हजार ६७५ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा साठा विक्रीसाठी आढळला. पेढीच्या समोर उभी असलेल्या गाडीची तपासणी केली असता त्यात ४५ हजार ७८९ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. दरम्यान, अधिकाऱ्यांचा संशय बळावला असता पथकाने सावळकर यांच्या राहत्या घराची झडती घेतली. त्यात एक कोटी ४ लाख २८० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी आढळून आला. या साठ्यात हिरा पान मसाला, विमल पानमसाला, राजनिवास पानमसाला, रॉयल ११७ सुगंधित सुपारी, व्ही वन सुगंधित सुपारी, नखरेली स्वीट सुपारी असा एक कोटी ५२ लाख ७४४ रुपये किमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला आहे. त्याचबरोबर ३० लाख रुपये किमतीचे वाहनदेखील जप्त करण्यात आले आहे.

# मणिपूर घटनेच्या निषेधार्थ साक्रीत कडकडीत बंद

### मुकमोर्चाद्वारे निषेध, शिवसेनेसह व्यापाऱ्यांचाही पाठींबा



**साक्री । प्रतिनिधी**

मणिपूरमध्ये आदिवासी महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ साक्रीत कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. बंदला उबाठा शिवसेना, विविध संघटना तसेच व्यापार्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. यावेळी समस्त आदिवासी संघटनांच्या वतीने मुकमोर्चा काढून प्रशासनाला निवेदन देण्यात आले. तसेच मणिपूर घटनेतील सबंधित नराधमांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात चोख बंदोबस्त तैनात आहे. शहरातील विविध आदिवासी संघटनांतर्फे दोन दिवसांपुर्वीच तहसीलदारांना निवेदन देण्यात आले होते. तसेच साक्रीत कडकडीत बंदचे आवाहन करण्यात होते. या आवाहनास शहरातील व्यापार्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. परिणामी, काल सकाळपासून बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. शहरातील शाळा, महाविद्यलये मात्र सुरु होती. तर तुरळक रिक्षा सेवा सुरु होती. त्यामुळे विद्यार्थी व प्रवाशांचे हाल झाले नाहीत. बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातीलमुख्य चौकांमध्ये पोलिस बंदोबस्त तैनात होते. डीवायएसपी सजन सोनवणे, साक्री पोलीस ठाण्याचे पीआय मोतिराम निकम, पीएसआय निकम, पीएसआय कोळी, पीएसआय रौंदळ, पोहेकॉ शिरसाठ, पोहेकॉ चव्हाण, शांतीलाल पाटील, रामपाल अहिर यांच्यासह फौजफाटा परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. बंददरम्यान सकल आदिवासी समाजातर्फे तहसील कार्यालयावर मुक मोर्चा काढून मणिपूर घटनेचा निषेध करण्यात आला. मोर्चात आदिवासी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी तहसीलदार साहेबराव सोनवणे यांच्याशी चर्चा करुन मागण्या मांडण्यात आल्या. मणिपूर येथे ४ मे २०२३ रोजी दोन आदिवासी महिलांना सुमारे एक हजार लोकांच्या जमावाने नग्न करुन त्यांची धिंड काढली. त्यांच्यावर बलात्कार केला. शिवाय महिलेच्या वडील व भावाला ठार मारले. या घटनेला ७० दिवस उलटूनही तेथील पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. सदर घटनेची क्लिप समोर आल्यानंतर मणिपूर सरकारने कारवाईचे आश्वासन दिले.

# संदर्भ सेवा रुग्णालयांमधील ‘कॅथलॅब’ मशीन दुरुस्तीसाठी दहा लाख रुपये मंजूर

### पालकमंत्र्यांच्या आदेशाने त्वरित कार्यवाही

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयांमधील हृदयरोग विभागातील अतिमहत्त्वाची कॅथलॅब यंत्रणा मुदत बाह्य (एक्सपायर) झाल्याने बंद पडल्याची गंभीर बाब लक्षात घेवून नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी आरोग्यसेवा उपसंचालक यांच्याशी बोलून तातडीने दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याच्या सूचना दिल्या. यानंतर १० लाख रुपये निधी काल रोजी दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आला आहे.

यामुळे मागील दोन महिन्यापासून रुग्णालयात अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी बंद झाल्याने संदर्भ रुग्णालयातील रुग्ण खासगी रुग्णालयात जात होते. याचा आर्थिक भुर्दंड रुग्णांना सोसावा लागत होता या निर्णयाने रुग्णांची परवड थांबणार आहे. प्रशासनाला पालकमंत्री दादा भुसे यांनी तातडीने बंद पडलेली कॅथलॅब दुरुस्त करून तातडीने सुरू करण्याचे आदेश दिले. या आदेशाची अमलबजावणी करत काल रोजी १० लाख रुपये निधी मंजूर केला आहे. यामुळे लवकरच ही मशिनरी दुरुस्त करून रुग्णांसाठी उपलब्ध होणार आहे. नवीन कॅथलॅब मशीनचा प्रस्ताव देखील शासन दरबारी प्रस्तावीत असून पालकमंत्री महोदय स्वतः या मशिनरीचा पाठपुरावा करत आहेत. यामुळे लवकरच नवीन मशिनला मंजुरी मिळणार आहे. नाशिकसह उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा ते विदर्भातून या रुग्णांवर उपचार होत असलेल्या संदर्भ सेवा रुग्णालयाच्या हृदयरोग विभागातील अतिमहत्त्वाची कॅथलॅब यंत्रणा कार्यान्वित होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शाळांच्या आपत्ती व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष निधीची तरतूद करावी : आ.कुणाल पाटील

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हयातील शाळांचे संपूर्णतः स्ट्रक्चरल ऑडीट आणि आपत्ती व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी निधीची तरतूद करावी तसेच धुळे तालुका आणि जिल्ह्यासह राज्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठीही निधी देण्यात यावा अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी तारांकीत प्रश्नातून आज विधानसभेत केली.



जिल्ह्यातील शाळांचे आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी आज दि.२८ जुलै रोजी राज्य विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात तारांकीत प्रश्न क्र.६४८५९ नुसार धुळे जिल्हयातील खाजगी आणि जिल्हा परिषदेच्या शाळेतील आपत्ती व्यवस्थापनाचा मुद्दा उपस्थित केला.यावेळी सभागृहात बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, राष्ट्रीय इमारत कायदा सन २००५ नुसार शासकीय व खाजगी शाळांनी सुरक्षेच्या सुविधा पुरवाव्यात, शाळेत अग्निसुरक्षा साधने अद्यावात ठेवणे, शाळेत ठरावकि कालावधीनंतर मॉकड्रील घेणे, इमारत बांधकामाचे मुल्यांकन करणे, शिक्षकांना अग्निशमन यंत्रणा हाताळण्याचे प्रशिक्षण देण्याची सुचना करावी अशी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. मात्र सद्यस्थितीत अशा प्रकारच्या संपूर्ण यंत्रणा कुठेही कार्यान्वित नाहीत. धुळे तालुका आणि जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष केले गेले असून प्राथमिक शिक्षण परिषदेने याबाबत चिंता व्यक्त केलेली आहे. म्हणून या शाळांमध्ये आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित कराव्यात त्यासाठी निधीची तरतूद करावी तसेच दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमरे बसविण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी यावेळी आ.कुणाल पाटील यांनी शिक्षण मंत्री ना.दिपक केसरकर यांच्याकडे केली.

### शिक्षण मंत्र्यांचे उत्तर

**शिक्षण मंत्री ना.दिपक केसरकर यांनी आ.पाटील यांच्या विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले कि, शाळांचे प्राथमिक स्ट्रक्चरल ऑडीट झाले असून उर्वरीत लवकरच पूर्ण करण्यात येईल, अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत संबधितांना सूचना देण्यात आल्या असून ही यंत्रणा चालविण्यासाठी संबधित शिक्षकांना प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येईल.**

# शेतीचा वाद; गोळीबारात बाप-लेक ठार

### नंदुरबार जिल्ह्यातील मलगाव परिसरातील घटना

**शहादा । प्रतिनिधी**

शिवारातील पिपल्यापाडा येथे शेतीच्या वादातून एकाच कुटुंबातील दोन गटात तुफान हाणामारी झाली. हा वाद एवढा विकोपाला गेला क त्यातून थेट गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात पिता व पुत्र असे दोन जण ठार झाले अन्य तर पाच जण जखमी झाले आहेत. जखमींवर नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यात एकाची प्रकृती चिंताजनक आहे .दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिसांच्या ताफा घटनास्थळी दाखल झाला.या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली आहे. अद्याप आरोपींना अटक झालेली नाही.दरम्यान घटनेतील आरोपींकडे गावठी पिस्तूल व तलवारी आल्या कोठून असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

मध्य प्रदेश राज्याच्या सीमेलगत असलेल्या मलगाव गावाजवळील (ता. शहादा)शिवारातील पिपल्यापाडा येथे एकाच कुटुंबातील दोन गटात भाऊबंदकीमध्ये शेत जमिनीच्या वाद होता याच वादातून आज दोन्ही गटात शेतातच वाद निर्माण झाला. हा वाद विकोपाला जाऊन थेट हाणामारीत रूपांतर झाले. या हाणामारीत तलवारी, विळा, लाकडी दांडके, आदी हत्यारांचा वापर करण्यात आला. हाणामारी एवढ्यावरच न थांबता थेट गावठी पिस्तूलातून दोन राउंड फायर करण्यात आले. या गोळीबारात अविनाश



सुकराम खर्डे (वय २६)रा. मलगाव (ता.शहादा) जागीच ठार झाला तर त्याचे वडील सुखराम कलजी खर्डे (वय ५४)यांचा उपचारादरम्यान जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला.तर सुकराम कलजी खर्डे (वय४२),गणेश दिवाण खर्डे (वय २४),रामीबाई दिवाण खर्डे सर्व रा. मलगाव (ता. शहादा) सुनील राजेंद्र पावरा (वय २३),अरुण राजेंद्र पावरा दोघे रा. बेडीया (ता. पानसेमल,मध्यप्रदेश) आदी पाच जणांचा जखमीमध्ये समावेश आहे. यात मयत अविनाश खर्डे यांचे काका रायसिंग कलजी खर्डे यांची प्रकृती चिंताजनक आहे.

सुनील पावरा याने गावठी कट्ट्याने फिर्यादीचा भाऊ अविनाश याचा छातीवर गोळी मारुन जागीच ठार केले. तर वडील सुखराम खडे काका सुकराम खर्डे यांच्यावरही गोळी झाडून गंभीर जखमी केले. त्यात वडील सुखराम यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला म्हणून वरील सहाही आरोपींविरुद्ध कलम ३०२ अन्वये खुणाच्या व दंगलीचा गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास सपोनि नितीन पाटील करीत आहेत.

दुसर्या घटनेत सोनीबाई गणेश खर्डे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी सुकराम कलजी खर्डे,अविनाश सुकराम खर्डे, रायसिंग कलजी खर्डे, ममता सुकराम खर्डे, शकुंतला रायसिंग खर्डे, देविदास रायसिंग खर्डे, निलेश रायसिंग खर्डे, जगदीश रायसिंग खर्डे (सर्व रा. मलगाव) या आठही आरोपींनी फिर्यादीचा शेतात जमिनीवर कब्जा करण्याचा उद्देशाने अनधिकृतपणे प्रवेश करून वाद घालून लोखंडी सळी,लाकडी डेंगारे व लाठ्या काढ्याने मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. म्हणून वरील आरोपींविरुद्ध कलम ३०७ अन्वये व दंगलीच्या गुन्हा दाखल झाला आहे. घटनेच्या तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतापसिंह मोहिते करीत आहेत. यावेळी अप्पर पोलीस निरीक्षक निलेश तांबे उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ता पवार यांनीही भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

# पेडकाईदेवी मंदिराच्या आवारात चोरीचा प्रयत्न; गुप्तधन काढण्याचा संशय

**धुळे । प्रतिनिधी**

तेहेतीस कुळांची कुलस्वामिनी असलेल्या पेडकाईदेवी (ता. शिंदखेडा) येथे मंदिराच्या आवारातील पूजेचे दुकान फोडण्यासाठी आलेल्या आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

चोरीचा प्रयत्न नसून गुप्तधन काढण्यासाठी संशयित आल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. सोनगीर-दोंडाईचा राज्य महामार्गालगत असलेल्या डोंगरावर पेडकाईदेवीचे भव्य मंदिर आहे. बुधवारी रात्री नऊच्या सुमारास वैद्यनाथ पेढेवाला याला मंदिराच्या परिसरात संशयित दिसल्याने त्याने साळवे गावातील ग्रामस्थांना फोन केला. ग्रामस्थ गेले असता पेडकाईदेवी मंदिराचा मुख्य पुजारी किशोर साहेबराव गुरव (रा. चिमठाणे, ता. शिंदखेडा), त्यांचा व्याही विजय गजानन गुरव (रा. कामनाथ महादेव मंदिराजवळ, नंदुरबार), प्रकाश फकिरा सोनवणे (रा. बुरझड, ता.जि. धुळे), जमल्या बेस्ता वळवी (रा. नवागाम, ता. शहादा, जि. नंदुरबार, विनोद रामपदारथ जयस्वाल (रा. देवानंद अभावा गाम, सुरत), अशोककुमार शिवंभर पटेल (रा. इंदिरानगर झोपडपट्टी, भतार, सुरत), गणेश आमश्या वसावे (रा. मांजरे, ता.जि. नंदुरबार) व नितीन रमेश धुमाळ (रा. डाबरी, दोंडाईचा) मंदिराच्या आवारात चोरी करण्याच्या प्रयत्नात असताना सापडले.

## थोडी आशा

देशाच्या आर्थिक विकासाच्या दरात सातत्य राखण्यासाठी मागणीची पातळी कायम राखणे महत्त्वाचे आहे; पण महागाई वाढल्यास त्यात घट होऊ शकते. त्यामुळे महागाई रोखण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

चालू आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६.१ टक्के राहील असे भाकित आंतरराष्ट्रीय नाणे निधीने केले आहे. गेल्या एप्रिलमध्ये अंदाज व्यक्त करताना नाणेनिधीने हा दर ५.९ टक्के राहील असे म्हटले होते. जागतिक विकास दराबाबतचा अंदाजही नाणेनिधीने उंचावला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक घडामोडींचा वेग अपेक्षेपेक्षा जास्त असल्याचे या वरून जाणवते. जागतिक विकास दरात ०.२ टक्के वाढ होऊन तो या वर्षी तीन टक्के असेल, असा अंदाज नाणेनिधीने व्यक्त केला आहे. विकसित आणि विकसनशील देशांमध्ये बाजारपेठा व अर्थव्यवस्थांची स्थिती सुधारत असल्याचे हा वाढीव अंदाज एक निदर्शक आहे. गेले वर्ष-सवा वर्ष जग महागाईवाढीच्या उच्च दराने ग्रस्त होते. ८.७ टक्क्यांवरून हा दर या वर्षी ६.८ टक्के व पुढील वर्षी ५.२ टक्के असेल, असा अंदाज नाणेनिधीने व्यक्त केला आहे; परंतु ज्याला 'गाभा महागाई वाढीचा दर' म्हणतात तो मात्र मंद गतीने ६.५ टक्क्यांवरून पुढील वर्षी ४.७ टक्के होईल, असे नाणेनिधीस वाटते. याचा अर्थ जगातील अनेक देशांमध्ये आणखी काही काळ मुख्य व्याजदर चढेच राहणार आहेत. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व या मध्यवर्ती बँकेने पुन्हा व्याज दरात पाव टक्का वाढ केली आहे. आता तेथील व्याजदर गेल्या बावीस वर्षातील उच्चांकी पातळीवर गेले आहेत.

महागाई हीच चिंता

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ताज्या अहवालानुसार जागतिक आर्थिक विकास दर जरी अपेक्षेपेक्षा चांगला राहणार असला तरी तो समान मात्र नाही. विकसित देशांसाठी हा दर गेल्या वर्षीच्या २.७ वरून १.५ टक्के असा कमी होणार आहे; पण विकसनशील देशांच्या बाबतीत तो सर्वसाधारणपणे या वर्षी चार टक्के राहणार आहे. उदाहरणार्थ ब्राझील या भारताच्या तुलनेत गरीब मानल्या गेलेल्या देशासाठी विकास दराच्या अंदाजात नाणेनिधीने १.२ टक्क्याची वाढ अपेक्षित धरली आहे. स्पेन व रशियाच्या विकासदरात आधीच्या अंदाजापेक्षा एक टक्का व ०.८० टक्के वाढ अपेक्षित आहे; परंतु जागतिक अर्थकारणाची गती मंदावण्याची जी भीती आधी व्यक्त होत होती, त्या तुलनेत बहुतेक सर्व देशांच्या अर्थव्यवस्थांनी आपली प्रतिकार शक्ती जास्त चांगली असल्याचे दाखवून दिले आहे. अर्थात भारत असो, वा ब्राझील, विकसनशील देशांपेक्षा बड्या देशांच्या अर्थव्यवस्थांचा आकार खूप मोठा असल्याने त्यांचा विकासदर थोडा वाढला तरीही तो जगासाठी उपयुक्त असतो. भारताच्या बाबतीत आधीच्या ५.९ टक्के या ऐवजी त्यात ०.२ टक्क्यांची वाढ होऊन विकास दर ६.१ टक्के होण्याचा नाणेनिधीचा अंदाज आहे. पुढील वर्षी विकास दर ६.३ टक्के असेल असे नाणेनिधीस वाटते. कोरोनाच्या साथीच्या तडाख्यातून भारताची अर्थव्यवस्था गेल्या वर्षभरात बाहेर येत आहे. रेल्वेचा अथवा विमान प्रवास असो, नागरिक मोठ्या प्रमाणावर प्रवास करत आहेत. अनेकविध वस्तूंच्या मागणीत व खपातही वाढ होत आहे. त्याप्रमाणे गुंतवणुकीचा वेगही वाढला आहे. ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत गुंतवणुकीचा दर ८ टक्के होता, तो जानेवारी-मार्च या तिमाहीत ८.९ टक्के झाला, असे सरकारने जाहीर केले आहे. यात खासगी उद्योगांच्या गुंतवणुकीचा वाटा मोठा असण्याची शक्यता आहे. यामुळे 'फिच' या पतमानांकन संस्थेनेही भारताच्या विकास दराबाबतचे अनुमान वाढवून ६.३ टक्के केले आहे. आशियाई विकास बँकेच्या मते हा दर ६.४ टक्के असेल. मात्र, आर्थिक विकासात महागाई हा मोठा अडथळा ठरू शकतो. गेले काही महिने ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाईवाढीच्या दरात थोडी घट झाली होती; पण जूनमध्ये हा दर पुन्हा ४.२५ वरून ४.८१ टक्के झाला. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईवाढीचा दर ३.४८ वरून ४.१२ टक्के झाला. महागाईच्या तुलनेत सर्व सामान्यांचे उत्पन्न वाढले नाही तर वस्तू व सेवांच्या मागणीवर प्रतिकूल परिणाम होतो. भारताची निर्यात सतत घटत आहे, याचा अर्थ अजूनही विकसित देशांमध्ये मागणी हवी तशी वाढलेली नाही. देशांतर्गत खपाबरोबरच परदेशातून मागणी वाढणे भारतासाठी आवश्यक आहे. नाणेनिधीने थोडी आशा व्यक्त केली असली तरी महागाईची चिंता कायम आहे.

# 'लोकमान्य' अर्थकारणी



लोकमान्य टिळकांची १ ऑगस्ट रोजी पुण्यतिथी असून ती साजरी करताना त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे उचीत ठरेल. ते केवळ देशभक्त, पत्रकार, गणितज्ञच नव्हते, तर त्यांच्या अंगी अनेक गुणांचा समुच्चय होता. त्यांचे अर्थकारणही काळाच्या पुढे बघणारे असून त्यांनी अंगीकारलेले कामही त्यांच्यातील प्रबळ अर्थजाणिवा दाखवून देणारे होते, असे आज मागे वळून बघताना जाणवते. यानिमित्ताने

लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी करताना त्यांच्या भरदार व्यक्तिमत्त्वाचे स्मरण होतेच, खेरीज त्यांच्या प्रभावी विचारांची उजळणी करणेही आवश्यक वाटते. टिळकांचे विविध विषयांवरील विचार आजच्या काळालाही तंतोतंत लागू पडतात. किंबहुना, भविष्याचा वेध घेणाऱ्या त्यांच्या विचारांमध्येच आजच्या काही चर्चित विषयांचा पाया बघायला मिळतो आणि त्याची तडही त्यांनी केलेल्या विचारमंथनातून पाहायला मिळते.

या पार्श्वभूमीवर लोकमान्यांच्या अर्थकारणावरील विचारांकडे बघता अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी हाती लागतात. इथे सांगावेसे वाटते की, आपण लोकमान्यांना नेहमीच विशिष्ट चाकोरीमध्ये अडकवतो. देशभक्त, थोर पत्रकार ही त्यांची ओळख आहेच पण यापलीकडेही त्यांचे फार मोठे काम लक्षात घेणे गरजेचे आहे. लोकमान्य उत्तम अर्थकारणी होते. गोखले, रानडे यांच्याखालोखाल लोकमान्यांची विधिमंडळातील अर्थसंकल्पावरील भाषणे गाजली. खाडीलकर तर त्यांचे वर्णन सर्वज्ञ आणि सर्वकृत या शब्दांमध्ये करत असत. म्हणूनच लोकमान्यांचा 'अर्थकारणी' या नात्यानेही विचार होणे गरजेचे आहे.

लोकमान्य टिळक हे भारताच्या इतिहासातील असे पहिले राजकारणी आहेत जे पूर्णवेळ राजकारण करत होते पण चरितार्थासाठी कधीच राजकारणावर अवलंबून नव्हते. चरितार्थाची त्यांची साधने पूर्णपणे वेगळी होती, स्वतंत्र होती. त्यामुळेच कोणी विचारले तर ते मी माझा चरितार्थ चालवू शकलो नाही, तर स्वत:च्या घरातच ताठ मानेने उभा राहू शकणार नाही आणि घरातच उभा राहू शकलो नाही तर समाजात कसा राहू शकेन, वा समाजाला कसे उभे करू शकेल, असे सांगायचे. आज आपण 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी'चा उल्लेख करतो वा आत्मनिर्भरतेचे महत्त्व जाणून घेतो तेव्हा याचे मूर्तिमंत उदाहरण पूर्वीच लोकमान्यांनी आपल्या या कृती आणि उक्तीतून समोर आणलेले दिसून येते. 'स्वदेशी' हा त्यांनीच दिलेला शब्द आहे. तसेच या शब्दाचा भारतीय राजकीय स्वातंत्र्यासाठी फायदा करून घेणारी पहिली व्यक्ती म्हणजेही लोकमान्यच. मुख्य म्हणजे याची सुरुवात त्यांनी स्वत:च्या घरापासून केली होती. आजही अशी उदाहरणे अपवादानेच सापडतील. थोडक्यात, 'आधी प्रपंच करावा नेटका'चे हे एक वेगळे रूप लोकमान्यांच्या विचारांमध्ये बघायला मिळते.

आंतरराष्ट्रीय अर्थकारण आणि राजकारणाचा पूर्ण अभ्यास करून त्याची भारतीय स्वातंत्र्यासाठी सांगड घालणारा एक महत्त्वाचा नेता म्हणूनही लोकमान्यांचे नाव घ्यावे लागेल. ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये निवडून गेल्यानंतर दादाभाई नवरोजी यांनी केलेले कार्य जनमानसापर्यंत नेण्याचे काम लोकमान्यांनी केले. संसदेमध्ये एखादा विषय मांडण्याची सुविधा असते कारण त्यावर विचार करणारी माणसे तुमच्यासमोर असतात. पण सर्वसामान्य मनुष्य आजही अर्थकारणापासून लांब आहे. लोकमान्यांच्या काळातही तो तसाच होता. तेव्हाचा सामान्य माणूसही रोजच्या धकाधकीत व्यस्त आणि व्यग्र होता; परंतु आर्थिक स्वातंत्र्य नसणे किंवा आर्थिक प्रगती नसणे हे राजकीय पारतंत्र्याचे एक मोठे कारण आहे आणि स्वतंत्र झाल्यानंतरही अर्थकारणाचा विचार केला पाहिजे, हे विचार लोकमान्यांनी मांडले आणि जनसामान्यांना पटवून दिले. आज आपण आर्थिक साक्षरतेची संकल्पना मांडली आणि स्वीकारली आहे. ती लोकमान्यांनी सुरू केली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

यासंबंधी एक उत्तम उदाहरण लक्षात घेता येईल. तेव्हा ब्रिटन सरकारने भारतासाठी दुष्काळ निवारण कायदा आणला होता. मात्र त्याचा कमी प्रसार व्हावा असाच सरकारचा साहजिक प्रयत्न होता, कारण या कायद्यात सरकारची जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. पण विधिमंडळाचे सभासद असल्यामुळे टिळकांनी त्याच्या प्रती मागवून घेतल्या आणि तुम्हाला त्या जनसामान्यांमध्ये वाटण्यास अडचण असेल तर मी वाटतो, असे ठामपणे सांगितले. तद्नंतर त्यांनी संक्षिप्त स्वरूपात कायद्यातील महत्त्वपूर्ण बाबींचे मराठीत भाषांतर केले आणि ही सर्व पत्रके 'केसरी'च्या अंकाबरोबर महाराष्ट्रभर फुकट वाटली. यामुळे हा कायदा सर्वसामान्यांना ज्ञात झाला आणि काहींना त्याचा लाभ घेता आला. ही एक कृतीही त्यांच्यातील अर्थकारण्याची ओळख देण्यास पुरेशी ठरणारी आहे.

आज आपण आत्मनिर्भरतेचा विचार करत आहोत. विशेषत: संरक्षण क्षेत्रावर आपला भर आहे. पंतप्रधानांनी 'आत्मनिर्भर भारता'ची घोषणा केली, नंतर पाच दिवस अर्थमंत्र्यांनी दररोज दीड-दीड तासांच्या पत्रकार परिषदा घेऊन त्याचे तपशील जाहीर केले. त्यानुसार आत्मनिर्भरतेचे सर्वात दृश्य स्वरूप आपल्याला आज संरक्षण क्षेत्रात दिसत आहे. पुढच्या पाच वर्षांमध्ये आपल्या संरक्षणविषयक गरजांच्या निदान ७५ टक्के उत्पादन भारतातच करण्याचे उद्दिष्ट समोर आहे. त्यासाठी लागणारा माल भारतीय कंपन्यांमधूनच खरेदी केला जाणार असल्याचे धोरणही ठरवण्यात आले आहे. ही बाब स्वागतार्ह असल्यामुळे सर्व थरांमधून तिचे स्वागत झाले आणि गेल्या अडीच-तीन वर्षांमध्ये त्याची अंमलबजावणी होतानाही दिसत आहे. पण याचेही उद्गाते लोकमान्य टिळकच आहेत. याचे कारण १८९१ मध्ये नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात टिळकांनी एक मागणी केली होती. ती अशी की, ब्रिटिश सैन्यासाठी लढणाऱ्या भारतीय सैन्याकडून वापरल्या जाणाऱ्या शस्त्रसामग्री, दारूगोळ्याची निर्मिती भारतातच व्हायला हवी. याबाबत त्यांनी दिलेली कारणमीमांसा खूपच चांगली आहे. याची आवश्यकता काय, असे सरकारकडून विचारले जाताच ते म्हणाले होते, तुमच्या सैन्यासाठी भारतीय नागरिक लढायला हवे असतील, तर त्यांच्या मनात त्या दारूगोळ्याविषयी, शस्त्रांविषयी कोणतीही शंका असता कामा नये. हे सांगताना त्यांनी १८५७ चा दाखला दिला होता.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात मंगल पांडे आदी मंडळींनी सुरू केलेल्या बंडामागे एक कारण होते. ते म्हणजे त्यांना देण्यात आलेल्या काडतुसांना गाईची वा डुकराची चरबी लागली असल्याची बातमी सैन्यात पसरली होती. हिंदूंना गाय पवित्र, तर मुस्लिमांना डुक्कर निषिद्ध त्यामुळेच हे बंड उभे राहिले. तसे प्रकार टाळण्यासाठी संरक्षण साहित्यासाठी लागणारे सामान इथेच निर्माण केले, तर कोणते सामान वापरले गेले आहे, हे भारतीय सैनिकांना समजेल असे लोकमान्य म्हणाले. सरकारला सैनिकांना त्याचा तपशील द्यावाच लागणार नाही, असे प्रतिपादन करून त्यांनी हे विचार त्यांना पटवून दिले. हे ऐकून घेतल्यानंतर इंग्रज सरकारने अशा सामग्रीच्या निर्मितीसाठी लागणारे तंत्रज्ञान भारतात उपलब्ध नसल्याची बाब समोर आणली होती. तेव्हा टिळकांनी आपल्या 'स्वदेशी' या संकल्पनेची फोड करून सांगितली. ती सांगताना ते म्हणाले की, भारतात परकीय माल आणण्यास माझा विरोध आहे. आम्हाला परकीय भांडवल चालेल, परकीय तंत्रज्ञान चालेल. पण तुम्ही इथे परकीय तंत्रज्ञान देणार असाल तर करार-मदारामध्ये काही गोष्टी स्पष्ट असायला हव्यात. जसे की, परदेशातून इथे येणारा तंत्रकुशल कामगार आमच्या देशात किती काळ राहील, हे ठरवा आणि तो कधी परत जाईल याचीही स्पष्टता द्या. त्याने भारत सोडण्यापूर्वी स्थानिक कामगारांना पुरेसे प्रशिक्षण दिले आहे की नाही याचे ऑडिट झाले पाहिजे, असे सांगण्यास लोकमान्य विसरले नाहीत. अशा प्रकारचे कायदे आजच्या एफडीआय वा एफआयआरमध्येही नाहीत. यावरूनच टिळकांचे अर्थकारण काळाच्या किती पुढे होते हे दिसून येते.

लोकमान्य दारूबंदीचे कट्टर पुरस्कर्ते होते आणि साहजिकच सरकार त्याबद्दल चालढकल करत होते. त्यावर बोलताना टिळकांनी सांगितले होते की, ब्रिटिश सरकार किती तरी जास्त उत्पन्न केवळ अबकारी करातून मिळवत असून त्यातील ९० टक्क्यांपेक्षा जास्त भाग दारूमधून येत आहे. त्यामुळेच ब्रिटिश सरकार दारूबंदी करू इच्छित नाही. बारकाईने विचार केला, तर टिळकांनी केलेली ही चर्चा आजच्या काळालाही लागू पडताना दिसते. आजही जीएसटीमध्ये दारूचा समावेश नाही. देशातील दोन राज्ये वगळता अन्य कोणत्याही राज्यांनी अधिकृतपणे दारूबंदी केलेली नाही. आपल्याकडे आजही 'लिकर बॅन'चा कायदा नाही.

आज शेअर बाजारात अनेक संकल्पना रूढ आहेत. एका अर्थाने त्याचेही प्रणेते वा जनक लोकमान्य टिळक आहेत. आज आपण कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा विचार करतो. व्यवसाय-धंद्याची समग्र माहिती लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजे असे मत मांडतो. टिळकांनीही त्यांच्या काळी याच मतांचा पाठपुरावा केला होता. या पार्श्वभूमीवर बघता लोकमान्यांचे वर्णन विद्वान, विश्वासू आणि विश्वस्त पुढारी असे केले जात असे. त्यांना विश्वस्त पुढारी म्हटले जायचे कारण त्यांनी लढलेला प्रत्येक खटला स्वत:च्या पैशांनी लढला नाही. लोकांनी पैसे गोळा करून लोकमान्यांना दिले होते. मात्र एखादा खटला संपल्याबरोबर लगेचच लोकमान्य आपल्याकडे आलेला एकूण पैसा आणि त्यातून झालेला खर्च याचा तपशीलवार हिशेब 'केसरी'तून प्रसिद्ध करत. म्हणूनच आपण त्यांना 'फ्री अँड फेअर डिस्क्लोजर'चे जनक म्हटले, तर वावगे ठरणार नाही. आजच्या कॉर्पोरेट विश्वात आदर्श मानली जाणारी ही स्थिती त्यांनी तेव्हाच दाखवली होती. म्हणूनच टिळक उत्तम राजकारणी होतेच पण उत्तम अर्थकारणीही होते, असे म्हणायला हवे.

**- चंद्रशेखर टिळक, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ**

# ढिगाऱ्याखालच्या किंकाळ्या अन् वेदना!

रायगड जिल्ह्यातील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या इर्शाळवाडीवर दरड कोसळली आणि १०० माणसं ढिगाऱ्याखाली गाडली गेली. सहज म्हणून गेल्या पाच वर्षांत या अशा नैसर्गिक आपत्तीने मृत्यू पावलेल्यांची संख्या पाहा किती आहे. १९ जुलै २०२३ रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास इर्शाळवाडी झोपेत असताना अचानक डोंगरच खाली घरांवर आला. शेतात राबणारे, काबाडकष्ट करून थकलेले ग्रामस्थ उद्याचं स्वप्न पाहत आपल्या घरातून झोपी गेलेले. शहरी भागात ११ ही काही झोपेची वेळ नसते; परंतु ग्रामीण भागात मात्र कष्ट करणारा शेतकरी लवकर झोपतो आणि पहाटे उठून कामाला लागतो. त्याप्रमाणे इर्शाळवाडीचे ग्रामस्थही झोपी गेले. १९ जुलैची रात्र ही त्यांच्यासाठी काळरात्रच




ठरली होती. दोन वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील आंबेगाव जवळच माळीण गाव असंच डोंगराच्या ढिगाऱ्याखाली गडप झालं. १६५ जणांचा त्यात मृत्यू झाला. रायगड जिल्ह्यातील तळीये गावावरही २४ जुलै २०२१ रोजी असंच संकट कोसळलं होतं. त्यात ४४ जणांचा मृत्यू झाला होता. २ जुलै २०१९ अशीच अतिवृष्टी झाली. धो-धो पाऊस कोसळत होता. चिपळूण जवळच्या तिवरे भेंदरवाडीतील धरण फुटले आणि २३ जणांना या धरणफुटीत जीव गमवावा लागला. दहा वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यातील अखंड गावच ढिगाऱ्याखाली गेलेलं. अशा कितीतरी घटना घडत आहेत. हे थांबवणं आपल्या हातात आहे की, नाही हे नाही सांगता येणार; परंतु त्यासाठीचे जे प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत, ते प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. इर्शाळवाडीच्या दुर्दैवी घटनेनंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिवसभर त्याच वाडीत ठाण मांडून बसले होते. घटनास्थळाची हवाई पाहणी करण्याचे फंडे आपण अनेकवेळा पाहिले आहेत; परंतु दीड-दोन तास पायी चालत जाऊन दुर्दैवी घटनास्थळी थांबून आढावा घेणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातला खऱ्या अर्थाने सामाजिक जाणिवेने काम करणारा शिवसैनिक महाराष्ट्राने पाहिला. राजकारणापलीकडे आपण जेव्हा विचार करू तेव्हा संततधार कोसळणाऱ्या पावसातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे चालत जातात, तेव्हा त्यांच्यातली माणुसकी आजही तितकीच आणि तशीच असल्याचे दिसले. २३ जणांचे मृतदेह सापडले, अन्य ग्रामस्थांचे मृतदेह त्या ढिगाऱ्याखालून काढणे अवघड बनले. यामुळे शासनालाही ढिगारा उपसण्याचे काम थांबवावे लागले. काही वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यातील एका गावावर असाच डोंगर कोसळला होता. शेकडो लोक मृत्युमुखी पडलेले. भला मोठा डोंगरच गावावर कोसळलेला. जवळपास पंधरा दिवस तो ढिगारा उपसण्याचे काम सुरू होते. अनेक जीव त्या ढिगाऱ्याखाली गुदमरून मृत्यूला कवटाळलेले. या अशा विचित्र स्थितीत सरकारला ढिगारा उपसण्याचे काम थांबवावे लागले होते. त्या दुर्दैवी घटनेवर आपत्ती व्यवस्थापनमध्ये काम करणारे उपजिल्हाधिकारी माझे मित्र होते.

**क्रमश:**

**- संतोष वायंगणकर**

## शब्दकोडे-१३४



आडवे शब्द

१. मर्यादा, सीमा ४. प्रेम, माया ६. फुरसतीप्रमाणे १०. हिंदीतील रहस्य ११. ललाट १२. वस्ती १४. हिंदी सिनेमांमुळे प्रसिद्ध पंजाबी कालवण, सरसोंका -- १६. कवि वि.वा. शिरवाडकर यांच्या धाकट्या भगिनीचे नाव १८. आशीर्वाद २०. नवसाने झालेला २२. निकृष्ट दर्जाचा २३. लवकर २४. शैली, लकब २५. नव्यानेच आलेला २७. नुसत्या भिंती बांधून उभे न राहणारे २८. बरोबरी ३०. आवड ३२. ओले गवत ३३. खेडे, शहर ३४. अग्रलेख ३६. झाडाला आलेली नवीन पाने ३८. पुन्हा पुन्हा ३९. मोठा जाड अंगरखा ४०. उद्यानंतरचा दिवस ४१. सक्षम ४२. अत्यंत दुष्ट ४४. औषध (हिंदी) ४५. युवक ४७. प्रथमपुरुषी एकवचनी सर्वनाम ४८. अंगावरील बारीक केस ५०. मवाळ धोरण ५१. महासर्प ५३. नमुना ५५. विंचवाचा संरक्षक अवयव ५६. किंमत ५७. चौथा हिस्सा ५८. निकट ६०. बाग ६२. मृत्युचा राजा ६४. पौराणिक वाहन ६६. राष्ट्रगीताची सुरुवात ७१. बांगला चलन ७३. फणधारी सर्प ७४. न थांबता ७६. नावाडी ७७. वेळ घालविणे ७९. तोफगाडी ८०. बाई, स्त्री ८१. थडगे

उभे शब्द

१. काचेला आरसा बनविणारा २. युवराज ३. ठराविक पैसे ४. कपाळभर लावलेले कुंकू ५. खिडकीची काच ६. च्या बरोबर ७. जमीनदार ८. तोटा ९. पृथ्वी १३. लहान १५. तृण १७. परमेश्वर १९. दागदागिने २१. लहान मुलांचे चावणे २२. घोटीव, कातीव २३. पंख २६. फणसाचा खाद्यभाग २८. नवऱ्याची दुसरी पत्नी २९. शिल्लक येणे ३१. रपाटून ३३. हवेतील थंडावा ३४. बचाव, रक्षण ३५. योग्य, उचित ३७. उदर ३८. अनुमती ३९. नाजूक ४०. अधिकाराचे स्थान, गीत ४१. कमळ ४३. सुकुमार ४५. तमाशातील कलावंत ४६. सूर्य, कापूस ४९. राबता, गर्दी ५१. इंद्रिय ५२. कळपातील प्रमुख हत्ती ५३. सासू झालेल्या आत्याबाई ५४. शरम ५५. हल ५९. व्रत ६१. वात्रट ६३. खानेसुमारी ६५. कंप, लटलट ६७. वर्तमानपत्रातील कप्पा ६९. हेतू ७०. कॉम्प्युटर मराठीत ७२. प्रश्न ७३. महिला ७५. पदार्थाचा सूक्ष्म भाग ७७. कावळा ७८. शंकर

## शब्दकोडे १३३ चे उत्तर

आडवे उत्तर

१.धिटाई ३.सोदाहरण ६.पाहणी ८.कर्ज ९.धडका १०.जड ११.थर १२.डगर १४.वजीर १५.नकलकार १७.वजा १९.खाणे २०.जन्मभर २१.जरतर २२.शोक २४.मानिनि २५.वत्सलता २७.कोबी २९.नाक ३१.रव ३२.रीत ३४.समाधानी ३५.थरथर ३६.मखर ३७.पखाल ३८.यक्ष ४०.रचना ४२.बेकरी ४३.यदा ४४.दम ४६.राज ४७.क्षमा ४९.तयार ५०.रामराम ५१.पाककला ५२.मकर ५४.रवळी ५५.कुचकट ५८.शिक्षा ५९.वट ६१.लट ६२.कारभार ६६.कनक ६९.सरशी ७०.कावराबावरा ७१.सवालजबाब ७४.माता ७५.ताळ ७६.कळस

उभे उत्तर

१.धिप्पड २.ईथर ३.सोकावणे ४.हजरजबाबी ५.रड ६.लवकर ७.हलका ८.करवत १०अ. सुकर १३.गणेशोत्सव १५.नभ १६.रजनीनाथ १८.जारणमारण २३.कल २४.माननीय २५.वरवर २६.तारीख २८.हिमालय ३०.करवंद ३३.तरबेज ३४.सखा ३६.मना ३७.परीक्षक ३९.क्षमायाचक ४१.चकमक ४५.मस्तक ४६.रामरक्षा ४८.माकड ५१.पाळीव ५३.रसरशीत ५५.कुट ५६.टका ५७.अवकाश ५८.शिवराळ ६०.टक ६१.लकवा ६३.रस ६४.भार ६५.सावळा ६७.नसता ६८.काजळ ७२.लता ७३.बक

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# स्वराज्य पक्षाच्या आंदोलनाला यश

## आंदोलनस्थळी दहा मिनिटात मनपाने बुजविले खड्डे








**नाशिक । प्रतिनिधी**

स्वराज्यप्रमुख छत्रपती संभाजी महाराज व महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख करण गायकर यांच्या आदेशाने स्वराज्य पक्षाच्या वतीने काल महाराष्ट्रभर खड्डे मुक्त महाराष्ट्र करा यासाठी आंदोलन करण्यात आले.

नाशिक जिल्ह्यात देखील विविध ठिकाणी यासंदर्भात आंदोलन केली गेली. यात नाशिक शहरातील सातपूर विभागात पपया नर्सरी या चौफुलीवर अनेक दिवसांपासून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. नाशिक महापालिका हे खड्डे बुजविण्यासाठी कोणतीही उपाययोजना करत नसल्याचे दिसून आले.

याविरोधात स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करत याठिकाणी रास्ता रोको आंदोलन करत खड्ड्यात वृक्षारोपण करण्यात आले. हे आंदोलन सुरू असतानाच महापालिकेला जाग आली. त्या ठिकाणी येवून मनपाच्या अधिकाऱ्यांनी स्वराज्य पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची दिलगिरी व्यक्त करत मनपाचे कर्मचारी बोलावून खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले.

या आंदोलनात उत्तर महाराष्ट्र प्रमुख केशव गोसावी, नाशिक कसमादे व पश्चिम विभाग जिल्हाप्रमुख आशिष हिरे, पूर्व विभाग जिल्हा प्रमुख उमेश शिंदे, राज्य कार्यकारणी सदस्य नवनाथ शिंदे, किरण डोके, ज्ञानेश्वर थोरात, नाशिक युवक महानगरप्रमुख पुंडलिक बोडके, युवक जिल्हाप्रमुख नितीन दातीर, जिल्हा कार्याध्यक्ष गिरीश आहेर, नितीन पाटील, विद्यार्थी आघाडी महानगरप्रमुख सागर पवार, दिनेश नरवडे, उत्तर महाराष्ट्र प्रमुख महिला आघाडी मनोरमा पाटील, राज्य कार्यकारणी सदस्य पुष्पा जगताप, महिला आघाडी जिल्हाप्रमुख सुलक्षणा गवळी, ज्ञानेश्वर कोतकर, सुदर्शन हिरे, योगेश चव्हाण, दादासाहेब जोगदंड, रागिणी आहेर, रेखा पाटील, संतोष रोकडे, कैलास गायकर, सुधीर काळे, अनिल वाघचौरे, महेंद्र खेडकर, गिरी, उत्तम विधाते आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.

सातपूर विभागात औद्योगिक वसाहत मोठ्या प्रमाणात असल्याने या ठिकाणी दररोज हजारो कामगारांची ये-जा असते. असंख्य लहान-मोठी वाहनेही या रस्त्यावर धावतात. त्यामुळे या भागातील खड्ड्यांवर जास्त लक्ष मनपाने द्यावे. याच भागातून मनपाला सगळ्यात जास्त कर मिळतो. या रस्त्यांवर अनेक वेळा गंभीर अपघात होऊन लोकांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. त्यामुळे या भागासह नाशिकमधील सर्व खड्डे बुजवावे व रस्त्यांची डागडुजी करावी. यानंतर अशी परिस्थिती पुन्हा निदर्शनास आल्यास थेट महापालिकेत आयुक्तांच्या दालनात स्वराज्य पक्षाच्या वतीने आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

# महारुद्र नागरी पतसंस्थेच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त आजपासून सहकार मेळाव्याचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील श्री महारुद्र हनुमान नागरी सहकारी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सहकाराचा प्रचार, प्रसार व्हावा आणि सहकार चळवळ आणखी बळकट व्हावी यासाठी संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय सहकार मेळावा, राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आणि राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा दि. २९ आणि ३० जुलै रोजी त्रंबकेश्वर येथे होत असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष कॉम्रेड सदाशिव माळी यांनी येथे दिली. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व सहकार परिषद मेळावा अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांच्या आयोजनातून महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित पुणे या राज्यस्तरीय सहकार चळवळीतील अग्रगण्य संस्थेचा तसेच नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकार फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयते यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमासाठी राज्याचे सहकार मंत्री ना. दिलीप वळसे पाटील अन्न व पुरवठा मंत्री ना. छगनराव भुजबळ, नाशिक जिल्हा फेडरेशन चे अध्यक्ष सुनील ढिकले, आ.सीमा हिरे, आ. देवयानी फरांदे, आ. सरोज अहिरे, आ. राहुल ढिकले, हिरामण खोसकर आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन करताना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन ची ३४ वी वार्षिक सर्व साधारण सभा होत असून राज्यस्तरावरील 'सहकार मित्र' हे पुरस्कार वितरण केले जाणार आहेत. पुरस्कार निवड समितीने निवड केलेल्यात संदीप माळी (कुंडल) सुरेश वाबळे (अहमदनगर) नीलिमा बामणे (नागपूर), गोरख चव्हाण( मुंबई), शशिकांत साळुंखे (जळगाव) आणि वासुदेव काळे, (श्रीरामपूर) या मान्यवरांना सहकार मित्र पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. श्री महारुद्र पतसंस्था सामान्य नागरिकांसाठी एक चळवळ म्हणून गेले पंचवीस वर्षापासून अखंडपणे सेवा देत आहे. सहकार चळवळ ही खऱ्या अर्थाने पुढे गेली पाहिजे आणि तिला योग्य ती दिशा मिळवून समाज मनामध्ये असलेले गैरसमज दूर होऊन विविध अडचणी आणि नागरिकांच्या अपेक्षा या संदर्भात ठोस असे काहीतरी निर्माण व्हावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असून दोन दिवस चालणाऱ्या या सहकार मेळाव्याचे आयोजन श्री सद्गुरू धाम आश्रम, स्वामी समर्थ केंद्र जवळ, रिंग रोड, त्रंबकेश्वर येथे केले असल्याची माहिती पत्र परिषदेमध्ये संस्थापक अध्यक्ष सदाशिवराव माळी यांनी दिली. यावेळी कल्याणी पाटील, सहसचिव बाळू थोरात, संचालक श्रीराम मंडळ आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला खास करून सहकार चळवळीतल्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

प्रोसेस जमा — **ॲड. श्री. दिपक जी. बोरसे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे न्यायालयात..**

**फौ.कि.अ.नं. ४६०/२०२३**

श्री. सुरेश बन्सीलाल सोनवणे उ.व.-२४, धंदा - मजूरी
रा.जैताणे, ता.साक्री जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

जन्म मृत्यू निबंधक
**तथा**
ग्रामसेवक, ग्रामपंचायत जैताणे
ता. साक्री जि. धुळे ....**जाबदेणार**

सुरेश बन्सीलाल सोनवणे (जन्म दिनांक ०१/०४/१९९९)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्टात दिनांक २७/०७/ २०२३ रोजी फौजदारी कि. अर्ज नं. ४६०/ २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्ममृत्यू नोंदणी अधिनीयम १९६९ कलम १३(३) व महाराष्ट्र जन्ममृत्यू नोंदणी नियम २००० मधील ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत वरील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता.१४/०८/२०२३ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. न्यायंदडाधिकरी प्रथमवर्ग सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. सदर नोटीस मे. कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक: २७/०७/२०२३

**क. लिपीक** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**फौजदारी न्यायालय साक्री** **फौजदारी न्यायालय साक्री**

---

**ॲड.शिवनाथ के. पाडवी**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील महाशय दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज नं. १९१/२०२३**

१) कै. ताराचंद गजमल सोनवणे (मयत) यांचे वारसदार
सुशिलाबाई ताराचंद सोनवणे वै. ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही** ....**जाबदेणार**

The Bombay Regulation Act - III

वारस दाखल्यास हरकती संबंधी जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते कि, ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी मा. कोर्टात वारस दाखला मिळणेसंबंधी The Bombay Regulation Act १८२७ अन्वये मा. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर.) साक्री यांचे कोर्टात लिगल हेअरशिप सर्टीफीकेट मिळणेसाठी अर्ज केलेला असून त्यामध्ये अर्जदार नं. १ चे सासरे, अर्जदार नं. १ ब) २ ड) यांचे आजोबा, अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील नामे कै. गजमल भुरा उर्फ भुऱ्या सोनवणे (भिल) यांचा मृत्यू दिनांक ५/११/२००८ रोजी राहत्या घरी, दिघावे, ता. साक्री, जि. धुळे येथे मयत झाले आहे,त्यांचे मृत्यू पश्चात त्यांना एकूण - अर्जदार नं. १ अ ) नामे सुशिलाबाई ताराचंद सोनवणे, (मयताची सून), अर्जदार नं. १ ब) प्रताप ताराचंद सोनवणे, (मयताचा नातू), अर्जदार नं. १ क) संदीप ताराचंद सोनवणे, (मयताचा नातू), अर्जदार नं. १ ड) सुरेश ताराचंद सोनवणे, (मयताचा नातू), चारीही रा. दिघावे, ता. साक्री, जि.धुळे, अर्जदार नं. २ काशिबाई कालमसिंग वळवी, (मयताची मुलगी) रा. मु. धिरजगाव, पो.सुंदरदे, ता. जि. नंदुरबार, अर्जदार नं. ३ उषाबेन विजयभाई मोरे, (मयताची मुलगी), रा. सतगव्हाण, ता. कुकुरमुंडा, जि. तापी असे वारसदार असून याव्यतिरिक्त इतर वारसदार नाही, असे नमूद केलेले आहे. त्याअर्थी ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत, तक्रार, म्हणणे द्यावयाचे असेल, त्याची सुनावणी दिनांक २५/०८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता तुम्ही या कोर्टात स्वतः अगर वकिलांमार्फत हजर होऊन आपले म्हणणे मांडावे. अन्यथा सदर अर्जासंबंधी कोणाचीही तक्रार नसल्याचे गृहीत धरून सुनावणीचे काम पुढे चालविले जाईल, व कोणाची काही हरकत नाही म्हणून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदर जाहीर नोटीस हे माझे सही व मा. दिवाणी न्यायाधीश वं. स्तर सो. यांचे न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आज दिनांक : / / २०२३ दिली असे.

आदेशावरून

**लिपिक** (शिक्का) **( उप अधीक्षक )**
**मा. दिवाणी न्यायालय क. स्तर सो.** **मा. दिवाणी न्यायालय क. स्तर सो.**
**साक्री यांचे कार्यालयात** **साक्री यांचे कार्यालयात**

---

**ॲड.दिनेश व्ही. माळी**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब (क.स्तर) यांच्या न्यायालयात**

**दि. क. अर्ज नं. ४२४/२०२२**

श्री.नंदकुमार धोंडू राणे, वैगरे १३
मु.पो. निजामपूर, ता. साक्री, जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही** ....**जाबदेणार**

कै.भागीरथीबाई सोनू वाणी (पाटील)
( मृत्यू दिनांक ०६/०९/१९९७) ...**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे खंड VIII अन्वये प्रमाणे वारस दाखला (Legal Heir Certificate) मिळणेसाठी म.सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री न्यायालयात अर्ज केलेला आहे. दाखल अर्जात पुढीलप्रमाणे मयत भागीरथीबाई सोनू वाणी (पाटील) यांचे दिनांक ०६/०९/१९९७ रोजी निधन झाले आहे. त्यांचे कायदेशीर वारस पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | नाव | मयताशी नाते |
|---|---|---|
| १ | श्री.नंदकुमार धोंडू राणे | नातू |
| २ | श्रीमती. सुरेखाबाई धृवकुमार राणे | नातसुन |
| ३ | श्री. भरतकुमार धृवकुमार वाणी | पणतू |
| ४ | सौ. स्वाती योगेश अमृतकर | पणती |
| ५ | सौ. निलमा मयूर वाणी | पणती |
| ६ | श्रीमती. स्नेहल राजेंद्र राणे | नातसुन |
| ७ | चि. प्रतिक राजेंद्र राणे | पणतू |
| ८ | कु.तेजल राजेंद्र राणे | पणती |
| ९ | कु. हर्षदा राजेंद्र राणे | पणती |
| १० | श्री. मुरलीधर सोनू वाणी | मुलगा |
| ११ | श्री. बबन सोनू वाणी (पाटील) | मुलगा |
| १२ | सौ. इंदुबाई सुधाकर कोठावदे | मुलगी |
| १३.१ | श्री. शिवाजी भका शरोरे | जावाई |
| १३.२ | श्री. गोकुळ शिवाजी शरोरे | नातू |
| १३.३ | सौ. ज्योती मोहन केल्हे | नात |
| १३.४ | सौ. संगीता राजेंद्र येवले | नात |
| १३.५ | सौ. कविता सुनील मालपुरे | नात |

ज्याअर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते क, मयत भागीरथीबाई सोनू वाणी (पाटील) यांच्या निधनानंतर त्यांचे कायदेशीर वारस म्हणून घो षत होवून मळणेसाठी व व वध प्रकारच्या शासकीय, निमशासकीय तसेच सहकारी कार्यालयातील कामांसाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अ धकार असल्यास त्यांनी मा. सह दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्त. ) साक्री यांच्या न्यायालयात दिनांक : ३१/०२/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वतः अगर व कलांमार्फत हजर रहावे वरीलप्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काही एक हरकत नाही, असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. सदर जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या शक्यानिशी प्र सध्दीस दिली असे.

स्थळ : साक्री
दिनांक : २८/०७/२०२३ आदेशावरून

**लिपिक** (शिक्का) **( उप अधीक्षक )**
**सह. दिवाणी न्यायालय (क.स्त.)** **दिवाणी न्यायालय (क. स्त. )**
**साक्री** **साक्री**

---

**ॲड. दिव्यानी एस. सोनवणे**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस, शासकीय व निमशासकीय संस्था, वित्तीय संस्था, वगैरे यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मखमलाबाद ता. नाशिक जि. नाशिक येथील स.नं. २० / ३क / २२ यातील फायनल प्लॉट नं. २०, क्षेत्रफळ ५७०.२५ चौ.मी. आकार ७१२.०० पैसे यांसी चतु:सिमा :-

**पुर्व :-** शिवरोड
**पश्चिम :-** प्लॉट नं.२१
**दक्षिण :-** १२.०० मी. रूंदीचा कॉलनी रोड
**उत्तर :-** प्लॉट नं. १९

वरील मिळकतीमधील वनराज रेसिडेन्सी अपार्टमेंटस् या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रहिवासी फ्लॅट नंबर ५, यांसी चटई क्षेत्र ४४.८६ चौ.मी. आहे. यांसी चतु:सिमा :-

**पूर्व :-** इमारतीची मोकळी जागा
**पश्चिम :-** रो-हाऊस नं.४
**दक्षिण :-** इमारतीची मोकळी जागा
**उत्तर :-** इमारतीची मोकळी जागा

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकतीस सौदा मिळकत असे संबोधण्यात आले असे.

सदर मिळकतीचा सौदा आमचे अशिल यांनी श्री. संभाजी रामचंद्र अनुसे रा. नाशिक यांच्याशी केलेला आहे. सदर वरील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल कायम खरेदीने घेणार असून सौदा करण्यात येवून बयाण्याची रक्कम ही अदा करण्यात आलेली आहे. तरी आमचे अशिल लवकरच वरील मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत. म्हणुन वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचा काही हक्क, सौदापावती, खरेदी, भाडेपट्टा, हितसंबंध, वारस, तारण, गहाण, तबदील, बक्षिसपत्र, अन्य काही व्यवहार झाले असल्यास, कोणाची काही एक हरकत असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदपत्रांसह खालील नमुद केलेल्या पत्त्यावर ०८ दिवसांच्या आत समक्ष येवून लेखी हरकत घ्यावी.

सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह कोणी काहीएक हरकत घेतली नाही तर आमचे अशिल वर वर्णन केलेल्या मिळकतीचा कायम खरेदी-विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर कोणाची काही एक तक्रार ऐकली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे.

(सदरहू जाहिर नोटीस आमचे अशिलाने दिलेली कागदपत्रे व माहितीच्या आधारे, आमचे मार्फत दिली असे.)

ठिकाण- धुळे
दिनांक- २८/७/२०२३

**(ॲड. दिव्यानी एस. सोनवणे, धुळे)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे**

---

**ॲड. शशिकांत आर. पाटील, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ७ वे प्रथमवर्ग मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज नं. ६६८/२०२३**

दिलावर बशीर पिंजारी,
वय-४३, धंदा-मजुरी, रा.नगांव, ता.जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

ग्रामसेवक सो. ग्रामपंचाय नंगाव, ता. जि. धुळे ....**सामनेवाला**

अर्जदारा, दिलावर बशीर पिंजारी याचा जन्म दि. (१/६/१९७७)

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग-१ सो. कोर्ट नं. ७ यांचे न्यायालयात फौ. कि. अर्ज. नं. ६६८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) अन्वये दिलावर बशीर पिंजारी याच्या जन्म दि. १/६/१९७७ रोजीच्या जन्माची नोंद होणे बाबत सामनेवाला याना आदेश होणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्जदार याने सदरच्या अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २५/८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. ७ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे शिक्यानिशी, सही व शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २८/७/२०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**कोर्ट नं. ५, धुळे** **न्यायालय धुळे**

---

**ॲड.दिनेश उत्तम फुले, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.ज्युडि. मॅजि. सो. वर्ग १ कोर्ट नं. यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज नं.६४४/२०२३**

मंगल गंगाराम अहिरे (लग्नापुर्वीचे नाव)
मंगल आत्माराम संदानशिव (लग्नानंतरचे नाव)
उ.व. : ४४ वर्ष, व्यवसाय :- घरकाम,
रा :- अकलाड मोराणे, ता. जि. धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

म.ग्रामसेवक सो.,
जन्म व मृत्यु नोंदणी विभाग,
ग्रामपंचायत कार्यालय, अकलाडे, ता.जि.धुळे. ....**सामनेवाला**

**(मंगल गंगाराम अहिरे हीचा जन्म दि. ०२/१०/१९७८)**

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि २५/०७/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं.६४४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे मंगल गंगाराम अहिरे हीच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. १३/९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-२५/७/२०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**फौजदारी न्यायालय सो. कोर्ट नं. ९ मे.फौजदारी न्यायालय सो. कोर्ट नं.**

---

प्रोसेस पेड — **ॲड. रोहिदास एच.पाटील, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. चिफ ज्युडी सो. यांचे कोर्टात**

**क्रि. एम. ए. नं. ६४०/२०२३**

वी. श्रीनिवास ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

मा. निबंधक जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
धुळे महानगरपालिका धुळे, ता.जि.धुळे ....**जाबदेणार**

**जन्म व मृत्यू नोंदणी नियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज**

आर अरुणकुमार राज याचा मत्यु दिनांक ६/७/२०१७ ची नोंद होण्याबाबत

ज्या अर्थी वरील अर्जदार अर्जदार याच्या भाचा नामे आर. अरूणकुमार राज याचा मृत्यु हा दि. ०६/०७/२०१७ रोजी धुळे येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे झालेला आहे महानगरपालिका हद्दीत झालेला आहे तरी अर्जदार याचा भाचा नामे आर. अरूणकुमार राज याचा मृत्युची नोंद होवुन मिळण्यासाठी अर्जदार याने जन्म व मृत्यू नोंदणी नियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये मृत्यु दिनांकाची नोंद होवुन मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे. चिफ ज्युडी मॅजि. सो. कोर्ट नं ९... यांचे कोर्टात दिनांक १३/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवुन वरील अर्जदार यास जन्म व मृत्यू नोंदणी नियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये मृत्यु दाखला (Death Certificate) देणेबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. सदर जाहिर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि२५/०७/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**चिफ ज्युडी मॅजि. सो. धुळे** **चिफ ज्युडी मॅजि. सो. धुळे**

## न्यूज कॉलम

### चितळे विद्यालयात कारगिल विजय दिन

**धुळे ।** शहरातील रा. के. चितळे माध्यमिक विद्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त कार्यक्रम झाला. ४८ महाराष्ट्र बटालियनचे सुभेदार इंदर कुमार, हवालदार गुरुनेक, मुख्याध्यापक व्ही. एन. हलकारे, पर्यवेक्षक बी. बी. निकुंभे उपस्थित होते. स्वप्नील चव्हाण यांनी कारगिल विजय दिनानिमित्त भारतीय सैनिकांच्या शौर्याची विद्यार्थ्यांना माहिती दिली. आर. एस. गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. के. ए. साळुंके यांनी आभार मानले.

### तापी नदीपात्रात अनोळखी इसमाचा मृतदेह

**दोंडाईचा ।**तापी नदीच्या पात्रात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह टाकरखेडा गावाजवळ आढळून आला. याबाबत नदीपात्रात मासेमारी करणाऱ्या कन्हैय्या भोई याने पोलिसांना याबाबत खबर दिली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन सदर प्रेत गावकऱ्यांच्या मदतीने बाहेर काढून शवविच्छेदनासाठी दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात पाठविले.

# धाडरा- धाडरी येथे विकासकामांचे बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते भूमिपूजन

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीण मतदारसंघातील धाडरा-धाडरी येथे २ कोटी २० लाखांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते करण्यात आले. इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नाने ही विकासकामे मंजूर झाली आहेत. या विकासकामांमुळे धाडरा व धाडरी या दोन्ही गावांचा विकासाचा अनुशेष भरुन निघण्यास मदत होणार असल्याने ग्रामस्थातून समाधान व्यक्त केले जात आहे. यावेळी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या वतीने धाडरा व धाडरी या दोन्ही गावांसाठी शवपेटी भेट देण्यात आली.



धुळे ग्रामिणमधील धाडरा व धाडरी या गावांमध्ये विकास कामांचा मोठा अनुशेष बाकी आहे, येथील विविध विकासकामे करण्याची मागणी पदाधिकारी व ग्रामस्थातून होत होती. या मागणीची दखल घेत बाळासाहेब भदाणे व जि.प.सदस्या शालिनीताई भदाणे यांनी या दोन्ही गावांसाठी भरघोस निधी मंजूर करुन आणला आहे. या विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी रतनपुरा गटाचे जि.प.सदस्य प्रभाकर पाटील, धुळे पंचायत समितीचे उपसभापती देवेंद्र माळी, धाडरी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं. सर्व पदाधिकारी व विविध विकास सोसायटीचे चेअरमन सर्व सभासद तसेच धाडरा येथील भास्कर पवार, अशोक रोकडे, गोकुळ जाधव, रमेश पवार, भाऊलाल पवार, अशोक सोनवणे, मनोहर वाघ, चेअरमन चतुर राजपुत, राजेंद्र शेवाळे, सरपंच अशोक आहिरे, उपसरपंच मुन्ना पवार, विलास पाटील ग्रा.प सदस्य सुरेश माळी, मनोज पवार, नाना पाटील, अनिल पवार, सतिष पवार, संजय पवार, निलेश पाटील, दादा वाघ, नितीन पाटील, आदीसह दोन्ही गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत धाडरा व धाडरी येथील विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. या कामांमध्ये धाडरी येथे खनिज विकास निधी अंतर्गत, ३० लाख रुपये निधीतून जि.प.मराठी शाळा कडे जाणारा रस्ता तयार करणे, ५ लाख रुपये निधीतून जि.प.मराठी शाळा अंतर्गत दुरुस्ती करणे, मग्रारोहयो अंतर्गत ३० लाख निधीतून रस्ते कॉंक्रिटीकरण करणे, जनसुविधा योजनेतर्गत गोपाळवाडी १० लाखांतुन अमरधाम बांधणे, जि.प.अंतर्गत ११ लक्ष निधीतून अंगणवाडी बांधणे, २४ लाख मंजूर निधीतून शेतशिवारासाठी पानंद रस्ते तयार करणे या कामांचा शुभारंभ करण्यात आला. धाडरा येथे मग्रारोहयो ३० लाख किमतीचे गाव अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे, गौणखनिज विकास निधीअंतर्गत जि. प. मराठी शाळेकडे जाणारा रस्ता तयार ३० लाख निधीतून तयार करणे तसेच ५ लाख निधीतून जि. प. मराठी शाळातंर्गत दुरुस्ती करणे, व ४५ लक्ष रुपयाचे शेत पानंद रस्ते तयार करणे या कामांचा धाडरा येथे शुभारंभ करण्यात आला. तसेच यावेळी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान बोरकुंड तर्फे धाडरी व धाडरी दोन्ही गावांना शेव पेटी भेट देण्यात आली. धाडरा व धाडरी येथे तब्बल सव्वा दोन कोटींच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आल्याने ग्रामस्थातून समाधान करण्यात येत आहे.

# सत्तेसाठीच सावरकरांचे, हिंदुत्वाचे विचार उद्धव ठाकरेंनी सोडले

## भाजप प्रदेशाध्यक्ष आ.बावनकुळे यांची टिका

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपच्या सर्वच नेत्यांनी हिंदुरुदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा आदर केला. मात्र त्यांच्या सुपूत्राने हिंदुत्वाचे स्वा. सावरकरांचे विचार हे सत्तेच्या लोभापायी सोडले. इतकेच नव्हे तर बाळासाहेबांचे विचार हा सुपूत्र जमिनीत गाडून टाकण्याचे काम करत आहे. अशी सडकून टिका भाजप प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर काल गुरुवार रोजी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राजस्थान मधील सिकर येथून देशभरातील विविध ठिकाणच्या किसान समृद्धी केंद्राचे उद्घाटन आणि पीएम किसान योजनेचा १४ वा हप्ता वितरीत काल केला गेला. यादरम्यानच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक येथील द्वारका चौकतील कर्मवीर भाऊसाहेब हिरे औद्योगिक सहकारी शेतकी संघ येथे कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर पत्रकारांशी बावनकुळे हे बोलत होते.

आ.बावनकुळे यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना म्हणाले, ठाकरे यांनी पंतप्रधान मोंदी यांच्याबद्दल ते विकासपुरुष आहे असे आधी सांगितले आणि आज ते तर पंतप्रधान मोंदी यांनी काहीच केले नाही असे सांगत फिरत आहेत. हे बघता उद्धव ठाकरे यांना अल्झायमर झाला दिसतो. एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितले महापालिकेच्या निवडणुका आम्ही थांबवल्या असून त्याला भाजप पक्ष जवाबदार नाहीच. महाविकास आघाडीने चुकीची प्रभाग रचना केली ती आम्ही महायुतीच्या सरकारमध्ये दुरुस्ती केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर निवडणुका लागणार आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी केलेला आरोप हाच मुली निराधार आहे असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वोत्तम असा भारताचा संकल्प केला. राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला तसेच पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पाला साथ देण्यासाठी राष्ट्रवादी पक्ष आमच्या विचार धारेत सहभागी झाला असल्याचे स्पष्ट करीत त्यांनी यानंतरही ज्या पक्षाला आमच्यासह राज्यात किंवा केंद्रात एनडीए सरकारमध्ये येण्याची इच्छा आहे त्यांना आम्ही स्वीकारण्यास तयार आहोत असे आमंत्रणच त्यांनी देऊन टाकले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीत त्यांनी खंजीर खुपसला असा आरोपही बावनकुळे यांनी केला. शेतकी संघ येथे कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर पत्रकारांशी बावनकुळे हे बोलत होते.



# हॉस्पिटलमध्ये येणे कसे टाळावे? : या विषयावर जनजागृतीपर मालिका

### सह्याद्री हॉस्पिटलचा उपक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक व उत्तर महाराष्ट्राच्या आरोग्य सेवेत अग्रणी असलेल्या सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे हॉस्पिटलमध्ये येणे कसे टाळावे? या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाची शृंखला सुरू केली आहे. अशा प्रकारची मालिका सुरू करणारे सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल हे पहिलेच हॉस्पिटल ठरले आहे.

फक्त उपलब्ध आरोग्यसेवा बाबत माहिती न देता कोणालाही हॉस्पिटलमध्ये येण्याची गरजच पडू नये यासाठी जनजागृती व्हावी हा या उपक्रमाचा मूळ उद्देश असल्याचे सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय चावला यांनी सांगितले. असे कार्यक्रम सह्याद्री हॉस्पिटल वर्षभर राबवणार असून जर कोणाला आरोग्य विषयक जनजागृतीपर कार्यक्रम त्यांच्या ऑफिस, शाळेत, महिला मंडळात, सार्वजनिक जागेत करायचे असेल तर त्यांनी हॉस्पिटलला संपर्क करावा असे आवाहनही त्यांनी केले.

या उपक्रमाचा नुकताच प्रख्यात हृदयरोग तज्ञ डॉ. आशुतोष साहू यांच्या मार्गदर्शनाने शुभारंभ करण्यात आला. महिलांचे आपल्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष तसेच महिलांना होणारे उच्च रक्तदाब व हृदयविकार कसे टाळावेत यासाठी खास महिलांसाठी या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. आशुतोष साहू यांनी निरोगी शरीर यासाठी विविध टिप्स दिल्या.

या कार्यक्रमात द्वारका परिसर ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा सविता चकोर, इंदिरानगर स्नेहवर्धिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा योगिनी कीर्तने, एचएएल निवृत्त संघाच्या अध्यक्षा कुमुदीनी कुलकर्णी, निरामय जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा पिंगळे, लोकज्योती महिला मंडळाच्या अध्यक्षा उल्का कर्णिक, युगांतर फाउंडेशनच्या अध्यक्षा रूपाली कोरी यांच्यासहित महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी डॉ. आशुतोष साहू यांनी निरोगी शरीर यासाठी विविध टिप्स दिल्या.

# पटेल कन्या कनिष्ठ महाविद्यालयात पोक्सो कायदा अंतर्गत मार्गदर्शन

**शिरपूर ।** शिरपूर शहर पोलिस स्टेशन पी. एस. आय. श्रीमती छाया भानुदास पाटील यांनी कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, दामिनी पथक, पोलीस दिदी, पोलीस दादा, गुड टच, बॅड टच, महिलांसाठीचे शासकीय कायदे,अधिनियम २०१२ पोक्सा, भारतीय दंड संहिता ३५४ विनयभंग, सोशल मीडिया याचा वापर करताना त्याचा होणारा गैरवापर व संभाव्य धोके या विषयी सविस्तर मार्गदर्शन करुन विद्यार्थिनींचे शंका निरसन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. बी. पाटील, प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक जे. पी. पाटील होते. या प्रसंगी पोलीस कॉन्स्टेबल मनोज दाभाडे, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, प्रशांत पवार, शिक्षिका शिला चौधरी, एन. ए. शेख व बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्तीत होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी राकेश रघुवंशी यांनी केले.संभाव्य धोके या विषयी सविस्तर मार्गदर्शन करुन विद्यार्थिनींचे शंका निरसन केले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे मनपा आयुक्तांचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्ती विक्री व आयातीचा साठा करण्यात येऊ नये, यादृष्टीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अशोक करंजकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. उच्च न्यायालयाने नद्यांचे प्रदुषण टाळण्यासाठी पीओपीच्या मूर्तींवर विक्री व साठा करण्यास यापूर्वीच बंदी घातलेली आहे.



उच्च न्यायालयाचे निर्देश तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार मूर्ती विक्रेते व साठा करणाऱ्यांनी पालन करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी केले आहे. येत्या १९ सप्टेंबर रोजी गणेशोत्सवास प्रारंभ होत आहे. तत्पूर्वी गणेश मूर्ती विक्री करणाऱ्या स्टॉलधारकांनी मनपाची परवानगी घ्यावी. ही परवानगी घेताना संबंधीत स्टॉलधारकांकडून प्लॅस्टर ऑफ पॅरीसची गणेश मूर्ती विक्री न करण्याबाबतचे हमीपत्र घेतले जाणार आहे. तसेच डोंगरे वसतिगृह, ठक्कर डोम, गोल्फ क्लब मैदान येथे मोठ्या प्रमाणावर काही खासगी लोक स्टॉल उभारतात. यामुळे संबंधीत स्टॉल उभारणाऱ्या खासगी संस्था व व्यक्तींना देखील याबाबतची सूचना केली जाणार आहे. गोदावरी नदी व इतर चार उपनद्यांमध्ये प्रदुषण निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली जाणार असून, त्यादृष्टीने शहरासह उपनगरांमध्ये कृत्रिम तलाव उभारले जाणार आहेत. गेल्या वर्षी २४९ ठिकाणी गणेश मूर्ती विक्रीचे स्टॉल उभारण्यात आले होते.

विक्रेत्यांनी शाडूमातीच्या गणेश मूर्ती विक्रीसाठी उपलब्ध करून द्याव्यात तसेच भाविकांनी देखील शाडूच्याच मूर्ती घेण्यास प्राधान्य द्यावे. तसेच गणेश मूर्तीसाठी पर्यावरणपूरक रंगांचाच वापर करण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक अशोक करंजकर यांनी केले आहे.

मनपाच्या बांधकाम, आरोग्य विभागामार्फत गणेशोत्सव कालावधीत मूर्ती संकलन केले जाते. त्यानुसार यंदा आकर्षक कृत्रिम तलाव व अधिकाधिक गणेश मूर्ती संकलन करणाऱ्या निवडक पथक तसेच कर्मचाऱ्यांचा मनपातर्फे सत्कार करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

बैठकीस उपायुक्त पर्यावरण विभाग डॉ.विजयकुमार मुंडे, उपायुक्त कर विभाग श्रीकांत पवार, शहर अभियंता शिवकुमार वंजारी, घनकचरा व्यवस्थापन विभाग संचालक डॉ.कल्पना कुटे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, कार्यकारी अभियंता पर्यावरण विभाग राजेंद्र शिंदे, स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक प्रशांत ठोके, शंतून नाईक आदी बैठकीस उपस्थित होते.

# आडगांव 'नामको' बॅंकेतर्फे सीए उत्तीर्ण 'क्रांती' चा सत्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

नामको बॅंकेच्या आडगाव शाखेतर्फे काल शाखा कार्यालयात पत्रकार सय्यद मोहम्मद यांची सी.ए उत्तीर्ण कन्या क्रांती सय्यद हिचा माजी सरपंच काशिनाथ शिंदे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल. श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नामको बॅंकेचे जनसंपर्क संचालक सुभाष नहार उपस्थित होते,



याप्रसंगी बॅंकेचे मॅनेजर देसले, अकैाटंट कुलकर्णी, फुले, पंचायत समितीचे माजी सदस्य मधुकर भोर, प्रगतशिल शेतकरी विठ्ठलराव शिंदे, किसनराव देशमुख, रमेश शिंदे, रूंजा माळोदे, युवा नेते रामभाऊ जाधव, विलास मते, संतोष चिडे , तपकिरे, पालक मोहम्मद सय्यद, ग्रामस्थ, सभासद व खातेदार उपस्थित होते, मॅनेजर देसले यांनी प्रास्ताविक केले, संचालक सुभाष नहार यांनी उपस्थित सभासद व ग्रामस्थांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत केले. संचालक नहार यांचा सभासद तपकिरे व रामभाऊ जाधव यांनी पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला. यावेळी संचालक नहार, तपकिरे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. शेवटी रामभाऊ जाधव यांनी आभार मानले.

# पंतप्रधान किसान समृद्ध केंद्राच्या माध्यमातून शेतकरी समृद्ध करण्याचा प्रयत्न : प्रा. जाधव

### कार्यक्रमाचे कुसुंबा येथे ऑनलाइन प्रक्षेपण

**धुळे । प्रतिनिधी**

पंतप्रधान किसान समृद्ध केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेती आणि शेतकरी समृद्ध करण्याचा प्रयत्न देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून होत असल्याचे प्रतिपादन धुळे जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्रा. श्री अरविंद जाधव यांनी कुसुंबा येथे केले.



देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या चौदाव्या हप्त्याचे आठ हजार पाचशे कोटी रुपयांचे अनुदान एकाच वेळी देशभरातील शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे वितरणाचा कार्यक्रम गुरुवारी सकाळी ११ वाजता राजस्थान येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण गावागावातील किसान समृद्धी केंद्राच्या माध्यमातून करण्यात आले. धुळे तालुक्यातील कुसुंबा येथे श्री आशापुरी कृषी सेवा केंद्रावर देखील या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणाची व्यवस्था शेतकऱ्यांसाठी करण्यात आली होती. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्रा. अरविंद जाधव, जिल्हा परिषद सदस्य संग्राम पाटील, जिल्हा परिषद सदस्य आशुतोष पाटील, भाजपाचे किशोर सिंघवी, कृषी अधिकारी कावेरी राजपूत, तालुका कृषी अधिकारी बोराळे, शेख यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राध्यापक जाधव म्हणाले की, देशामध्ये पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक ,आर्थिक, औद्योगिक, अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. नुकत्याच झालेल्या चांद्रयान ३ च्या यशस्वी उड्डाणानंतर देश प्रगतीच्या दिशेने निघाल्याचे चित्र दिसू लागले आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून ७० टक्के शेतकरी,शेतीवर अवलंबून आहे. ही बाब ओळखून इथली शेती आणि शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी पंतप्रधान महोदयांनी एक कोटी २५ लक्ष किसान समृद्धी केंद्रांना मंजुरी दिली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना एकाच छताखाली बियाणे, खते, अवजारे, शेतीपूरक साहित्य, आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण पद्धती याची माहिती देण्याची संकल्पना मांडली आहे. त्यांच्या अशा व्यापक भूमिकेतून निश्चितपणाने शेतकरी समृद्ध झाल्या वाचून राहणार नाही. पंतप्रधान महोदयांनी सुरू केलेल्या या उपक्रमाचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. आधुनिक शेतीची कास धरावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण गावागावातील किसान समृद्धी केंद्राच्या माध्यमातून करण्यात आले. धुळे तालुक्यातील कुसुंबा येथे श्री आशापुरी कृषी सेवा केंद्रावर देखील या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणाची व्यवस्था शेतकऱ्यांसाठी करण्यात आली होती.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# निकृष्ठ कामांमुळे नविन जलकुंभाला तडे; लाखो लिटर पाण्याची नासाडी











धुळे । शहरात १५४ कोटी पाणीपुरवठा योजेंअंतर्गत नगांवबारी येथे उभारण्यात आलेल्या दोन जलकुंभांचा साडेचार वर्षापासुन वापरझालेला नाही. त्यामुळे जलकुंभाा चारही बाजुने मोठया प्रमाणावर तडे पडले आहेत. अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना अंतर्गत धुळे शहरात आणलेल्या पाण्याने हे जलकुंभ मागिल काही दिवसांपासुन भरण्याचे काम सुरु होते. जलकुंभ पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्या जलकुंभाना सर्वत्र तडे असल्याकने त्यातुन पाणी झिरपण्यास सुरुवात झाली. ही बाब म.न.पा. प्रशासनास कळाल्यानंतर तातडीने जलकुंभातुन पुर्ण पाणी लगत असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रं. ३ वर सोडण्यात आले. जलकुंभामध्ये जास्त कालावधीसाठीपाणी ठेवले असता जलकुंभ फुटण्याची दाट संभावना आहे. जलकुंभाना लगतच नगांवबारी परिसरातील दाट वस्ती आहे. या वस्तीत कच्चे व पक्के घरे आहेत. अश्या परिस्थितीत सदर जलकुंभ फुटल्यास वित्तहानी होईल. तसेच जिवीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. याच कारणास्तव म.न.पा. प्रशासनाने सदरचे जलकुंभ पुर्णतः खाली करण्याचा निर्णय घेतला. १५४ कोटीच्या पाणीपुरवठा अंतर्गत बांधलेले जलकुंभ हे इस्टीमेट प्रमाणे तयार करण्यात आलेले नाही. सदरचे काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. . सदर कामांमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. सदर जलकुंभाना बांधल्यापासुन काही दिवसातच तडे गेल्याचे स्पष्ट दिसत होते. त्यामुळे सदर कामांची चौकशी होण्याबाबत यापुर्वीही मागिल अनेक वर्षापासुन देवपुर शिवसेना तसेच शिवसेना महानगर, धुळे मार्फत मोठया प्रमाणावर मागणी केल्यावरही सत्ताधारी भाजप पक्षातील काही पदाधिकारी व नगरसेवक तसेच म.न.पा. प्रशासनातुन काही अधिकारी यांनी ठेकेदाराशी आपसात संगनमत करुन, सदर कामतील भ्रष्टाचार लपविण्याच्या हेतुने आजतागायत कोणतीही कार्यवाही केली नाही. १५४ कोटी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत उभारण्यात आलेले जवळपास सर्वच म्हणजे १३ जलकुंभ अशाच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे निकामी झाल्या आहेत.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# पावसाळ्यातील आपत्तीच्या दुर्घटना टाळण्यासाठी आराखडा तयार करावा : जिल्हाधिकारी














धुळे। पावसाळ्यात येणाऱ्या आपत्तीच्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक विभागाने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन त्वरीत सादर करावा. अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अभिनव गोयल यांनी यंत्रणेला दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात आज मान्सुन पुर्व कालावधीत केलेल्या पुर्व तयारीबाबत आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी श्री.गोयल बोलत होते. बैठकीस जिल्हा पोलिस अधिक्षक संजय बारकुंड, मनपा आयुक्त देविदास टेकाळे, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, परिविक्षाधीन सनदी अधिकारी सत्यम गांधी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार,निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपजिल्हाधिकारी सुरेखा चव्हाण, एसआरपीएफचे सहायक समादेशक चंद्रकांत पारसकर, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार, धुळे महानगरपालिकेचे उपायुक्त विजय सनेर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. आपत्तीच्या वेळी आवश्यक असणारे साहित्य तपासून घ्यावे. धोकादायक ठिकाणांची निश्चिती करून त्याठिकाणी सूचना फलक लावण्यात यावेत. पूरग्रस्त व दरडग्रस्त गावांसाठी संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. धरणनिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करण्यात यावे. महानगरपालिका, नगरपालिकेने धोकादायक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घ्यावे यासाठी पॅनल इंजिनिअरची त्वरीत नियुक्ती करावी. पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याचा संदेश गावपातळीवर देण्यात यावा तसेच तहसिलदारांनी ग्रामपंचायतस्तरावर दंवडीद्वारे माहिती देण्यात यावी.

संकलन : दिपक वाघ